सकाळ TODAY

कोल्हापूर, सोमवार,
२८ मार्च २०२२

# 'आर्थिक साक्षरते' बाबत व्याख्यान

टेंबलाईवाडी, ता. २७ : ताराराणी विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग, कमला कॉलेज आणि 'सेबी'च्या लिंकेज प्रोग्रॅम अंतर्गत जागतिक पैसा आठवड्यानिमित्त विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांचे व्याख्यान झाले.



टेंबलाईवाडी : जागतिक पैसा आठवड्यानिमित्त व्याख्यानात बोलताना डॉ. विजय ककडे. शेजारी अन्य मान्यवर.

डॉ. ककडे यांनी आर्थिक साक्षरतेचे महत्त्व, पैशाची गुंतवणूक काळजीपूर्वक करून तो कसा सांभाळावा, वाढवावा याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी पैसा गुंतवताना आमिषांना बळी न पडता जागरूक राहून कसा पैसा गुंतवावा याबद्दल विद्यार्थिनींशी संवाद साधला. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी महिलांनी वित्तीय साक्षर होणे का गरजेचे आहे? महिला योग्य गुंतवणूक करून कुटुंबाच्या आणि पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासास हातभार लावू शकतात, असे मत मांडले. विद्यार्थिनींनी क्रिप्टो करन्सीमधील गुंतवणूक, ऑनलाईन बँकिंगमध्ये होणारी फसवणूक आणि गुंतवणुकीच्या विविध पर्यायांबाबत असणाऱ्या शंका विचारुन त्याचे निरसन करून घेतले.

डॉ. उमेशकुमार सम्यक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दिनकर कबीर यांनी स्वागत केले. प्रा. हेमलता मिणचेकर यांनी परिचय करुन दिला. प्रा. नम्रता निकम उपस्थित होत्या. प्रा. उदयकुमार इनामदार यांनी आभार मानले.